# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**(नॅक समिती तर्फे ‘‘अ’’ दर्जा प्राप्त)**

## जाहीर प्रगटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (१) ते (९) अन्वये विहित केल्यानुसार **डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद च्या कार्यक्षेत्रात असलेल्या सर्व संलग्नीत महाविद्यालय / परिसंस्था / शासकिय संस्था / संशोधन संस्था यांच्याकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून संशोधन केंद्रास मान्यता देण्यासाठी विहित केलेल्या प्रक्रियेनुसार विहित नमुन्यामध्ये रु. २५०००/- शुल्क भरणा करुन ऑनलाईन प्रक्रियेद्वारे दि.०५ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.**

प्रस्तुत प्रकरणी ज्या महाविद्यालयाकडे / परिसंस्थेकडे ज्या विषयाच्या संशोधन केंद्रासाठी अर्ज करावयाचा आहे, अशा विषयाचे संबंधित महाविद्यालयाकडे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु असणे आवश्यक आहे तसेच किमान दोन संशोधक मार्गदर्शक, संशोधनास सहाय्य करणारे अनुभवी कर्मचारी, अद्ययावत प्रयोगशाळा, अद्ययावत इमारत, अद्ययावत ग्रंथालय, साधन सामुग्री व नियमामध्ये विहित केल्यानुसार पायाभूत सुविधा असणाऱ्या सर्व संबंधित महाविद्यालयाने / परिसंस्थेने संशोधन केंद्रास मान्यता देण्यासाठी ऑनलाईन प्रक्रियेद्वारे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या **www.bamu.ac.in** या संकेत स्थळावर Homepage वरील Affiliation Portal या लिंकवर Click करुन Proposal Guidelines २०२०-२१ येथे Click करुन त्यातील सुचनेनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. आपल्या माहितीसाठी सदर ठिकाणी Helpline देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी **ऑनलाईन प्रक्रियेद्वारे विहित शुल्कासह अर्ज केल्यानंतर संबंधित प्रस्तावाची हार्डकॉपी दि.१० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेत शैक्षणिक विभागास सादर करणे आवश्यक राहील तसेच ज्या संशोधन केंद्रास यापूर्वी विद्यापीठाने विहित केलेल्या नियमानुसार मान्यता दिलेली आहे. अशा सर्व संबंधित संशोधन केंद्राच्या व्यवस्थापनाने विद्यापीठ मान्यतेचे पत्र, संशोधन मार्गदर्शकांच्या नावासह संख्या, विद्यार्थी संख्या, संशोधन करण्यात आलेल्या संशोधनाचा तपशिल व इतर पुरक दस्ताऐवज जोडून दि. १० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागास माहिती सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा सदरील संशोधन केंद्राची मान्यता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी गांभिर्याने नोंद घेण्यात यावी.**

**विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद** *
संदर्भ क्र. शैक्ष/संलग्न/प्रगटन/पीपीजी/ २०१९-२०/४१८४ *
दिनांक :- १४-१०-२०१९ *
=R=

स्वाक्षरित/-
कुलसचिव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.